अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व
शिष्यवृत्ती योजना ( Pre matric Scholarship)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण क्रीडा व युवक कल्याण विभाग
शासन निर्णय, क्रमांक:पपंका-२००७/(२७०/०७)/असंक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ जुलै, २००८.

वाचा :- सह सचिव, अल्पसंख्यांक कार्य, मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.३(१)/२००६-पीपी-१, दि.१६ एप्रिल, २००८.

प्रस्तावना :- अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा.पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या १५ कलमी कार्यक्रमानुसार केंद्र शासनाने अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या १ ली ते १० वी या वर्गातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या विकासासाठी ही योजना असून अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया मागास गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना १ ली ते १० वी पर्यत शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर होणारी गळती थांबावी यासाठी, तसेच अल्पसंख्यांक पालकांना त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्यास उत्तेजन देण्यासाठी ही योजना आहे. यामुळे अल्पसंख्यांक मुलांच्या पालकांचा त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावर होणा-या खर्चाचा भार कमी होईल. शिक्षणाद्धारे मुलांचे सक्षमीकरण करणे हा या योजनेचा एक हेतू आहे. यामुळे अल्पसंख्यांक समाजाची सामाजिक-आर्थिक उन्नती होण्यास मदत होईल. सदर योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत (२००७-२०१२) अंमलात आणावयाची असून या योजनेची सुरुवात २००८-०९ या चालू शैक्षणिक वर्षापासून करावयाची आहे. केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक मंत्रालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रातील निर्देश लक्षात घेवून राज्यात ही योजना अंमलात आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :- राज्यातील अल्पसंख्यांक मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, शिख व पारसी समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून लागू करण्यात येत आहे.

योजनेची व्याप्ती :- सदर योजना राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व शासकीय/ निमशासकीय/ खाजगी शाळांमधून शिक्षण घेणा-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.

**शिष्यवृत्तीचे दर** :- लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र | बाब | वसतीगृहात राहणारे विद्यार्थी * | वसतीगृहाबाहेरील विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क<br>इयत्ता ६ वी ते १० वी | रु.५००/-प्रति वर्ष<br>प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | रु.५००/-प्रति वर्ष<br>प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत |
| २ | शिक्षण शुल्क -<br>इयत्ता ६ वी ते १० वी | रु.३५०/-प्रतिमाह<br>प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | रु.३५०/-प्रतिमाह<br>प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत |
| ३ | परिरक्षण भत्ता -<br>शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरीता अनुज्ञेय | | |
| | (१) इयत्ता १ ली ते ५ वी | ----- | रु.१००/- प्रतिमाह |
| | (२) इयत्ता ६ वी ते १० वी | रु.६००/-प्रतिमाह<br>प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | रु.१००/-प्रतिमाह |

(* जे विद्यार्थी ते शिकत असलेल्या शाळांच्या वसतीगृहात राहत असतील अथवा राज्य शासनाच्या वसतीगृहात राहत असतील केवळ तेच विद्यार्थी या योजनेत वसतीगृहाचे विद्यार्थी गणले जातील.)

**शिष्यवृत्तीसाठी पात्रता** :- मागील वर्षी ५०% पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेले तसेच पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु.१.०० लाखापेक्षा कमी असलेले विद्यार्थी या योजनेस पात्र ठरतील.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम १९९२ मधील अनुच्छेद २ (सी) नुसार मुस्लीम, शिख, ख्रिश्चन, बौध्द व पारसी समाजास अल्पसंख्यांक म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. त्यानुसार २००१ च्या जनगणनेच्या आधारे राज्यातील खालील अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे एकूण ३६८०० शिष्यवृत्त्या निश्चित करण्यात आल्या आहेत :-

| अ.क्र | अल्पसंख्यांक | शिष्यवृत्ती संख्या |
|---|---|---|
| १ | मुस्लीम | २१६८० |
| २ | ख्रिश्चन | २२४० |
| ३ | शिख | ४६० |
| ४ | बौध्द | १२३४० |
| ५ | पारसी | ८० |

या शिष्यवृत्त्यांपैकी ३०% शिष्यवृत्त्या मुलींसाठी राखीव आहेत. या प्रमाणात मुली शिष्यवृत्त्यांसाठी उपलब्ध झाल्या नाहीत तर त्या शिष्यवृत्त्या मुलांना देण्यात येतील.

**लाभार्थी निवडीची कार्यपध्दती** :- या शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थींची संख्या मर्यादित असल्याने दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबातील ज्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची रक्कम सर्वात कमी आहे अशा विद्यार्थ्यांस प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार लाभार्थींची निवड उत्पन्नाच्या चढत्या क्रमाने करण्यात येईल. लाभार्थीची निवड करताना विद्यार्थ्यांच्या गुणांच्या तुलनेत कमी वार्षिक उत्पन्नास प्राधान्य असेल. पुढील वर्षासाठी शिष्यवृत्तीचा विचार करताना, मागील वर्षात मंजूर केलेल्या शिष्यवृत्तीचे नूतनीकरण केल्यानंतर उर्वरित शिष्यवृत्तीसाठी नवीन अर्जाचा विचार केला जाईल.

**कालावधी** :- सदर शिष्यवृत्ती इयत्ता १ ली ते १० वी या अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीसाठी लागू राहील. परिरक्षण भत्ता हा शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरिताच देय असेल.

## अटी व शर्ती :-

१ अल्पसंख्यांक समाजाच्या इयत्ता १ ली ते १० वी या वर्गात शिकणा-या विद्यार्थ्याकरिता ही शिष्यवृत्ती योजना आहे. शिष्यवृत्तीचा पुढील वर्षाकरीता लाभ मिळण्यासाठी मागील वर्षाच्या परिक्षेमध्ये ५०% पेक्षा जास्त गुण आवश्यक आहेत. परिरक्षण भत्ता वसतीगृहातील तसेच वसतीगृहाबाहेरील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय आहे.

२ वार्षिक परिक्षेमध्ये ५०% पेक्षा कमी गुण मिळाल्यास विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सवलत बंद करण्यात येईल. मात्र काही अत्यंत अपरिहार्य कारणास्तव ५०% पेक्षा कमी गुण असतील तर त्या कारणाचा विचार करुन मुख्याध्यापक/ प्राचार्य किंवा शाळेच्या सक्षम प्राधिका-याच्या शिफारशींचा शासनामार्फत शिष्यवृत्ती चालू ठेवण्याकरीता विचार केला जाईल.

३ एका कुटुंबातील २ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

४ शाळेच्या सक्षम प्राधिका-यांनी निश्चित केलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

५ स्वयंरोजगार असलेल्या पालकांचे उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र हे स्व-प्रमाणपत्र स्वरुपाचे, नॉन ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर असणे आवश्यक आहे. तसेच नोकरी करणा-या पालकाचे उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र देखील अशाच प्रकारे नॉन ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर मालकाने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

६ वसतीगृहात रहात असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत तो सध्या राहत असलेल्या पत्त्यावरुन तसेच कायम निवासाच्या पत्त्यावरुन विद्यार्थी वसतीगृहात रहात असल्याचे संबंधीत शाळा/ संस्था प्रमाणित करील.

७ विद्यार्थ्यांचे एका शाळेतून दुस-या शाळेत स्थलांतर शैक्षणिक वर्षात करता येणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत जेव्हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींशी संबंधीत आवश्यक असल्यासच अशा प्रकारचे स्थलांतर करता येईल.

८ विद्यार्थ्यांकडून शाळेच्या शिस्तीचा अथवा शिष्यवृत्तीच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास शिष्यवृत्ती स्थगित करण्यात येईल अथवा संपुष्टात आणण्यात येईल. या योजनेच्या अटींचा भंग झाला असल्याची शासनाची खात्री पटल्यास संबंधीत विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

९ जर एखाद्या विद्यार्थ्यास चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती दिली गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसूली करण्यात येईल.

१० शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार पात्र विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

११ ज्या विद्यार्थ्याना या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात आला आहे त्यांना अशा प्रकारच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१२ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्गाच्या शिष्यवृत्त्या वा इतर तत्सम शिष्यवृत्त्या घेणा-या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

१३ ज्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर होईल त्यांच्यासाठी ही शिष्यवृत्ती वितरीत करण्याकरीता त्यांच्या नांवे बॅंकेत खाते उघडण्यात यावे.

<u>शिष्यवृत्तीचे नुतनीकरण</u> :- विद्यार्थ्यास ५०% गुण मिळाल्यानंतर तसे प्रमाणपत्र सादर केल्यावर त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीचे पुढील शैक्षणिक वर्षाकरीता नूतनीकरण करण्यात येईल.

<u>शिष्यवृत्ती अर्जाची उपलब्धता व ते सादर करण्याचा अंतिम दिनांक</u> :- शिष्यवृत्तीचे अर्ज महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहेत. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी या अर्जाची तातडीने छपाई करुन ते संबंधीत जिल्हा शिक्षण अधिका-याकडे उपलब्ध करुन घ्यावेत. जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी जिल्हयातील शाळांमध्ये हे अर्ज उपलब्ध करुन द्यावेत. दि.३१-०८-२००८ पूर्वी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज ते शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापक/ प्राचार्य यांच्याकडे सादर करावेत. दि.३१-०८-२००८ नंतर प्राप्त होणा-या अर्जाचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही. अपूर्ण भरलेले, आवश्यक प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

शिष्यवृत्तीचे अर्ज शाळांच्या मुख्याध्यापक/ प्राचार्यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे दि.०५-०९-२००८ पूर्वी सादर करावेत. जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी या अर्जाची पडताळणी करुन पात्र ठरणारे अर्ज संबंधित विभागीय उपसंचालकामार्फत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती कक्षाकडे दि.१०-०९-२००८ पर्यंत सादर करावेत. शिष्यवृत्ती कक्षाने केंद्र शासनाच्या निकषानुसार शिष्यवृत्तीस पात्र